PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 5

# पुरोगामी जाणिवा व्यक्त करणारी मुस्लिम मराठी नाटके

**बरखा आर सय्यद**
संशोधक विद्यार्थिनी,
मराठी विभाग,
राणी चन्नम्मा विद्यापीठ,
बेळगाव. **कर्नाटक भारत**

**डॉ. विनोद गायकवाड**
संशोधन मार्गदर्शक,
मराठी विभाग,
राणी चन्नम्मा विद्यापीठ,
बेळगाव. **कर्नाटक भारत**

**मुस्लीम मराठी नाटकांतून तळागाळातील मुस्लिम समाजाच्या निकृष्ट प्रतीचे जीवन आणि त्यांची सुख—दु:खे, भाव—भावना आणि अनुभव चित्रित झाले आहेत. हा समाज शिक्षण व अर्थकारण यात फार मागे पडलेला आह, हे ही स्पष्ट केले आहे. तळागाळातील मागासलेल्या मुस्लिम समाजापर्यंत शिक्षण पोहोचणे खूप गरजेचे आहे. शिक्षणाअभावी त्यांचा दृष्टीकोन संकुचित बनला आहे. त्यांचा विकास खुंटला आहे. मुस्लिम समाजातील प्रत्येक घरात शिक्षणाचे महत्व पटवून देऊन त्यांना शिक्षण देणे, आवश्यक आहे. जेणेकरून त्यांचा कौटुंबिक व सामाजिक विकास साध्य होईल अशी पुरोगामी जाणीव या नाटकांतून व्यक्त झाली आहे.**

१४ व्या शतकापासून मुस्लिम मराठी साहित्यिकांनी कथा, कादंबरी, कविता, नाटक, वैचारिक इत्यादी वाड्.मय प्रकारांत लेखन करुन मराठी साहित्यात मोलाची भर घातली. १९८० नंतरचे महत्वाचे नाटककार म्हणजे शफाअत खान होय. त्यांची 'मुंबइचे कावळे', 'किस्से', 'भूमितीचा फार्स', 'राहिले दूर घर माझे', पोपटपंची, आणि 'शोभायात्रा' अशी सहा नाटके प्रकाशित आहेत. त्या काळातील जातीयवाद, धर्माचं राजकारण, हिंदू—मुस्लिमांत वाढत जाणारे ताण—तणाव, जातीय दंगली, तळागाळातील लोकांची फरफट यांचा अविष्कार त्यांच्या नाटकांतून पहावयास मिळतो. व्यावसायिक

रंगभूमीवरील 'राहिले दूर घर माझे' हे त्यांचे पहिलेच नाटक. मानवी वृत्ती आणि प्रवृत्ती यातील भावनात्मक संघर्ष या नाटकातून प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. तर, बाबरी मशीद पाडली गेली, आणि त्यानंतर घडलेल्या घटनांवर प्रतिक्रिया म्हणून 'शोभायात्रा' हे प्रामाणिक, निर्भीडपणे आजच्या वास्तवाला तडक भिडणारं नाटक लिहिल्याचं शफाअत खान म्हणतात. या नाटकांतून त्यांनी माणसाला माणूस म्हणून पाहण्याची, स्वीकारण्याची नितांत निकड आहे, हे सत्य मांडले आहे. जावेद कुरैशी यांच्या नाटकांत देखील मानवतेची आस दिसून येते.

मुस्लिम मराठी नाटकांतून जाणवणाऱ्या पुरोगामी जाणिवा पुढील प्रमाणे आहेत.

१. मानवतावादी वर्तन करण्याची जाणीव

२. समाजाला विषमतामुक्त, मानवतावादी, भ्रष्टाचार मुक्त व शोषणमुक्त अशी जगण्याची नवी सृजनशील दृष्टी देण्याची जाणीव

## मानवतावादी वर्तन करण्याची जाणीव :—

### चित्कार — जावेद कुरैशी 'पाशा' ':—

जावेद कुरैशी 'पाशा' यांच्या 'चित्कार' या नाटकामध्ये 'मानवाला मानवतेची आस आहे पण आज समाजात मानवताच हरपत चालली आहे, कोणत्याही धर्मात परिपूर्ण मानवतेचे दर्शन घडत नाही, म्हणून मानव अस्वस्थ दिशाहीन होत चालला आहे' अशी जाणीव व्यक्त झाली आहे.

या नाटकातील अमितला सामाजिक व आत्मिक उन्नतीचा ध्यास लागला आहे. नैतिकतेतून, स्पष्ट विचारधारेतून सामाजिक उन्नती साध्य होईल असे त्याला वाटते. त्यासाठी समाजात नैतिकता निर्माण झाली पाहिजे, असे त्याला वाटते '...... अरे, ज्या देशातील माणसांमध्ये नैतिकता नसेल, तो देश ...... देश म्हणून तरी कसा उभा राहणार आहे?' असे तो म्हणतो. सर्व राष्ट्राने एकच संस्कृती, एकच भाषा व एकच धर्म स्वीकारला तर खरे राष्ट्र निर्माण होईल असे त्याला वाटते. परंतु तो शेवटी हिंदू म्हणून हिंदूत्ववादी प्रवाहातच राहतो. मुस्लिमांनी समान नागरी कायद्याचे पालन केले पाहिजे, येथील बहुसंख्यांक हिंदूबरोबर राहताना मुस्लिमांनी राष्ट्राचा 'हिंदू राष्ट्र' म्हणून स्वीकार केला पाहिजे, असे त्याला वाटते. मुस्लिमांच्या राष्ट्रीय निष्ठेविषयी अमितही साशंक आहे. त्याच्या विचारांतून कलामला मानवतेचा पराभवच होताना दिसतो.

या नाटकातील कलाम हा देशातील तळागाळात राहणाऱ्या, धर्मनिरपेक्षतेच्या बेगडी देखाव्याला बळी गेलेल्या मुस्लिमांचे प्रतिनिधित्व करतो. धर्माच्या नावावर झालेल्या हिंदू– मुस्लिम दंग्यानी तो उव्दिग्न झाला आहे. तो इतिहासातील दलित, तळागाळातील पिचलेल्या लोकांवर झालेले अन्याय– अत्याचार, शिक्षणापासून दुरावलेपण, अस्पृश्यतेची वागणूक यामुळे मन होरपळलेलं असतानाच पुन्हा समाजात धर्माच्या नावावर होणारी कोंडी, ससेहोलपट, अत्याचार यामुळे असहाय झाला आहे. हिंदू–मुस्लिम दंगलीत त्याचा एकुलता एक मुलगा मारला गेला, त्याची झोपडी बेचीराख झाली, त्याचा अख्खा मोहल्ला जळून राख झाला. अमित कलामला म्हणाला, की ' तुम्हाला शेवटी बहुसंख्यांक हिंदूसोबत रहायचं आहे'. त्यावर कलाम म्हणाला, 'अरे, मला एकदा स्पष्ट होऊन जाऊ दे. मी कोणत्या बहुसंख्यांक हिंदूसोबत राहू? माझी वस्ती चांभार, मेहतर, मांग–महारांच्या वस्तीला लागून, कुणब्या–तेल्यांच्या बाजूला! हे सर्व माझे बाजूवाले हिंदू बहुसंख्यांकांच्या देशात संघर्ष करताहेत! तूच सांग मी कोणत्या हिंदूसोबत राहू? असे, जीवनाच्या सर्वच निकडीच्या प्रश्नांना असा हिंदू–मुसलमान, हिंदू–मुसलमान म्हणून वाटा दाखवू नकोस! अरे, हा देश आता तरी घडवूया, सर्वांना सोबत घेऊन......'

ज्या हिंदू बहुसंख्यांक राष्ट्रात हिंदू बांधवांवरही अन्याय–अत्याचार केला जातो, तेथे मुस्लिमांची काय अवस्था? हे सर्व बदलायला हवे, सर्वांनी मिळून हे राष्ट्र घडवायला हवे, असा आदर्श, मानवतेचा विचार कलाम मांडतो.

कलाम हिंदू वस्तीत राहतो. धर्म निरपेक्षतेचा बेगडी देखावा विस्कटून जातो, त्याची झोपडी बेचीराख होतो, तेव्हा तो उव्दिग्न होतो. शेवटी मुस्लिम वस्तीत रहायला जाण्यास निघतो. तो म्हणतो 'मग जाऊ दे माझ्या वस्तीत मला! खूप झालं! कसाही जगलो तरी चार जातीवाल्यांत असेन! शेवटी आमचं आयुष्य अटींवरच जगते रे! इथे असलो तर धर्मनिरपेक्षतेच्या बेगडी देखाव्यासाठी तुमच्या प्रत्येक टाकावू संस्कारात हसरा चेहरा घेऊन उभं राहावं लागते आणि मोहल्यात असलो तरी छोटीसी दाढी, गोल टोपी, पायघोळ घालून, मजहब जिंदाबाद, महजब जिंदाबाद म्हणत जगावं लागेल! अरे....... बघ...... बघ, माझ्या झोपडीच्या राखेतही त्या शाखेवाल्याने भगवा रोऊन ठेवला आहे.

धर्मांधांच्या ज्वलंत धर्मशक्तीचे विष दुसऱ्या धर्माच्या निष्पाप लोकांची निघृण हत्या करण्यास प्रेरक ठरले, धर्मरक्षणासाठी मानवता चेंदली गेली, याचा कलामला विषाद वाटतो.

नेत्यांच्या दिशाभूलीला बळी पडून आपण केवळ प्यादे ठरलो याचे त्याला दु:ख वाटते. एका ताटात जेवणाऱ्या हिंदू—मुस्लिमांनी एकमेकांची डोकी मारली याचे त्याला दु:ख होते. सत्तेसाठी षडयंत्र रचणाऱ्या नेत्यांच्या चिथावणीला समाज बळी पडतो, या जाणीवेमुळे तो उध्वस्त होतो.

शेवटी हिंदू मुस्लिम दंगलीत श्वेताला वाचवण्याच्या प्रयत्नात त्याचा बळी गेला.

हिंदू—मुस्लिम दंगलीची श्वेता ही तरुणीही बळी ठरली. या दंगलीत तिचा पती, तिचे मूल मारले गेले. त्यामुळे ती उध्वस्त झाली. कोणत्याही धर्मात मानवतेचे आचरण घडवून आणले जात नाही, याचे तिला दु:ख झाले. उव्देगाने ती म्हणते, 'सहस्त्र कोटी देवांच्या भूमीवर माणसं सापडत नाहीत आणि पीरांच्या वस्तीत नुसती श्वापदे! पावलागणीक द्यावी लागते श्वासांची ओळख. प्रत्येक श्वासाचा रंग वेगळा, धर्म वेगळा!'

माणूसकीला काळीमा फासणाऱ्या पाशवी कत्तलींमुळे ती उध्दवस्त झाली. येथे मानवतेचा बळी देऊन आपापल्या धर्माला श्रेष्ठ सिद्ध करण्यासाठी धर्मांध लढत आहेत, पण धर्मांने दाखवलेली माणूसकीची वाट ते विसरले. धर्मांच्या नावावर माणूसकी बाजूला ठेवून सर्वच पशू झालेत, यामुळे ती उध्वस्त झाली.

समाजातील बुद्धीजीवी पांढरपेशा लोकही स्वार्थापायी मानवता विसरुन जातात. हे उच्चवर्गीय आपल्या चौकटीबाहेर येत नाहीत. प्रोफेसरांच्या कॉलनीजवळची झोपडपट्टी जाळली गेली, तरी त्यांनी काहीही केले नाही. दलित समाजातील स्त्रियांवर बलात्कार होत असतानाच्या किंकाळया अशा लोकांना ऐकू येत नाहीत, म्हणून श्वेताने प्रोफेसरना सुनावले. कामापुरती माणुसकी व धर्मनिरपेक्षता वापरणाऱ्या प्रोफेसरच्या अंगावर श्वेताने थूंकुन आपला निषेध व्यक्त केला.

हिंदू धर्माचे रक्षक म्हणवून घेणारा नेता धर्म रक्षणाच्या नावाखाली हिंसा घडवून आणतो. या राष्ट्रात अल्पसंख्यांकांना शासनाने सोयी—सवलती देऊ नयेत, हे राष्ट्र त्यांचे नाही, अशी धरणा ठेवून त्याप्रमाणे आपल्या अनुयायांची दिशाभूल त्याने केली. त्यांना हिंसाराच्या गर्तेत लोटले. जाणून—बुजून हिंदू—मुस्लिम वस्तीत दंगल पेटवली. रात्री हिंदूंच्या देवळावर हिरवा झेंडा लावला, मशिदीत डुकराचे पिलू फाडून फेकायला लावले. धर्मयुद्धाच्या नावावर त्याने तळागाळातील निष्पाप मुस्लिमांची कत्तल केली. खरे तर त्याला हिंदू धर्माची कोणतीही चाड नाही. धर्मांच्या नावावर हिंदू—मुस्लिम दंगल घडवून स्वत:चा स्वार्थ साधण्याचा त्याचा मानस आहे.

मुस्लिमांचा नेता करीम हा हिंदू नेत्याला सामील झालेला होता. सत्ता प्राप्त करण्यासाठी तो धर्माचा वापर करतो. हिंदू नेत्याशी संगनमत करुन त्याने दंगलीस सहाय्य केले, व स्वत: मात्र हज यात्रेला निघून गेला. या दंगलीमध्ये अशिक्षित, अंधधर्मश्रद्धा ठेवणारे, तळागाळातील पिचलेले जीवन जगणारे मुन्ना व सलीमसारखे निरपराध लोक मारले गेले.

या नाटकाचा प्रारंभ, आंधळा— म्हणजे मानवी प्रवृत्ती मानवतेला शोधत आहे, असा आहे. तो मानवता शोधतो कुसावरील वेशींवरील — दलित — पतितांसाठी! त्यावेळी तो मानवतेला म्हणतो, की तुला शोधत असताना 'तुझ्यासाठी बुद्धाची करुणा तळहातावर घेऊन कुठवर स्थितप्रज्ञ असायचं? की तुझ्यासाठी 'परमेश्वरा यांना क्षमा कर' असं म्हणत हातापायात खिळे ठोकून क्रुसावर शांतपणे ताटकळत बसायचं? किंवा तुला शोधायचं वाळवंटातील हिरा गुंफेत प्रेषितासारखं? ...... इथेच, याच समाजात, याच माणसांमध्ये शोधेन मी तुला. माझा विश्वास आहे, तू भेटतील म्हणून! अशी आशावादी आहे.'

मानवी प्रवृत्तीचा मानवतेसाठी सर्व धर्मांमध्ये शोध चालला आहे, ती मानवता याच माणसांमध्ये भेटेल याचा विश्वास वाटतो.

नाटकाच्या शेवटी मात्र मानवी प्रवृत्तीला सापडतं ते मानवतेचं कलेवर! धर्मासाठी, स्वार्थासाठी माणूसकीचा बळी जातो, असे चित्र उभे करुन नाटक समाप्त होते. शेवटी आंधळा म्हणतो, 'मी तुम्हाला विध्वंसकतेची ग्वाही देतोय. ही चेतावनी आहे तुम्हाला..... असं हिंदू मुसलमान म्हणत माणूसकी मरणार असेल तर मी विध्वंसकतेची ग्वाही देतो, मग कुणीही सुरक्षित राहणार नाही, मग असू दे तळहातावर बुद्धाची करुणा, हातपायात खिळे ठोकून क्रुसावर शांतपणे असू दे, नाही तर वाळवंटातील गुंफेत प्रेषितासारखं किंवा गोकुळातील वृंदावनात असू दे, कुणीही सुरक्षित राहणार नाही.....' मानव — मग तो कोणत्याही धर्माचा का असेना, या समाजात जर मानवता जपली गेली नाही, तर संपूर्ण सामाजाचा विध्वंस होईल. कुणीही सुरक्षित राहणार नाही. या संपूर्ण समाजाला विध्वंस होईल, अशी जाणीव या नाटकातून व्यक्त झाली आहे.

'चित्कार' विषयी संजय जीवने लिहितात, 'चित्कार! यातना— आक्रोशाचा..... दंगलखोर बाम्हणवादी षडयंत्राचा शैतानी बुरखा फाडणारे मुक्तनाटय. हिंदू— मुसलमानांच्या नव्हे, समस्त माणूसकीचे मैत्रीपूर्ण गर्भधारण करणाऱ्या करुणेच्या प्रसव

वेदनेलास आकारणारे 'स्टिरिओ फोनिक' शब्दांदोलन, जनसामान्यांच्या युद्धभुमीवर जावेदच्या 'चित्कार' ने रंगवले आहे........'

राजकरणातील षड्यंत्राचा बुरखा फाडून नाटककरांनी हिंदू–मुस्लिम दंगलीमागचे वास्तव उघड तर केलेच आहे, तसेच माणूसकीला साद घालून माणुसकीला आवाहन करण्याची जाणीव या नाटकातून प्रभावीपणे व्यक्त झाली आहे.

**राहिले दूर घर माझे — शफाअत खान :—**

'राहिले दूर घर माझे' हे शफाअत खान यांचे नाटक जात, धर्म व देशापलीकडे जाऊन निखळ मानवतेचे दर्शन घडवणारे आहे. भारत पाकिस्तान फाळणीच्या वेळी हिंदू मुस्लिम कुटुंबांची वाताहत झाली. ते देशोधडीला लागले. या फाळणीच्या दंगलीत आपले सर्वस्व गमावलेले कासीमचे कुटुंब पाकिस्तानातील लाहोर शहरात गेले. तेथे त्यांना रहायला एक हवेली मिळाली, जी पूर्वी हिंदूंची होती. त्या घरातील सर्व लोक मारले गेले होते, पण एक हिंदू आजी — माई तिथेच राहिली होती. कासीमच्या कुटुंबाने माईला हवेलीतून घालवण्यासाठी सुरवातीला खूप प्रयत्न केले, पण ती गेली नाही. ती स्वत:चे घर व देश सोडून जाण्यास तयार नव्हती. पण तिने या लोकांना स्वीकारले. माईनेच या लोकांना पाणी दिले, स्वयंपाकाला लाकडे दिली. या लोकांमुळेच नि:संतान झालेली हवेली पुन्हा सजीव झाली, याचा तिला आनंदच झाला. कासीमने मात्र तेथील उस्ताद या धर्मांध माणसाच्या मदतीने माईला मारून टाकण्याचा बेत केला, पण हमीदाला हे आवडले नाही. तिने कासिमला हे चुकीचे वर्तन करण्यापासून परावृत्त केले. एखाद्या निष्पाप स्त्रीला मारणे पाप आहे, असे हमीदाने सांगितले. तिने स्वत:ची, मुला–बाळांची शपथ देऊन कासीमला माईला मारून टाकण्याच्या विचारापासून परावृत्त केले. तसेच, कासीम आपल्या कुटुंबीयांना माईशी बोलू नका, तिच्याशी संबंध ठेवू नका, असे सांगत होता, तेव्हा हमीदाने हदीस — मोहम्मद पैगंबर (स.अ.) यांच्या वचनांमधील एक वचन सांगितले, की 'शेजारी– मग तो कोणत्याही धर्माचा असो– त्याला जो त्रास देतो, दु:खात लोटतो, अल्लाची कसम तो खरा मुसलमान नव्हे. नमाज, रोजे, दान, धर्म कशाचा ही फायदा होणार नाही. अल्लाह त्याला कधीही जन्नत नसीब करणार नाही.'

हमीदाचे हे विचार खऱ्या अर्थाने माणुसकी जपणारे आहेत. धर्मापेक्षा मानवता श्रेष्ठ असल्याची साक्ष देणारे असे विचार आहेत.

पाकिस्तानात कासीमच्या भागात राहणारा उस्ताद हा माणूस धर्मांध तर होताच, पण तो धर्माचा वापर स्वत:च्या स्वार्थासाठी करत होता. त्याने हिंदू माईच्या मुस्लिम कुटुंबासोबत राहण्याचा विरोध केला. त्याचे म्हणणे होते, की सर्व हिंदूंनी भारतात निघून जावे. पण नासीर या शायरने तेथील लोकांना योग्य ते विचार दिले. नासिरचा सर्वधर्मसमभावविषयक दृष्टिकोन त्याच्या आणि अलीमच्या संवादातून स्पष्ट होतो. तो संवाद पुढीलप्रमाणे होय –

'नासीर – तू मुसलमान आहेत?

अलीम – हो. आहे मी मुसलमान.

नासीर – का?

अलीम – मतलब?

नासीर – अरे तू मुसलमान का आहेस?

अलीम – त्याचा कधी मी विचार केला नाही.

नासीर – अरे, मग आता कर.

अलीम – (आश्चर्याने) आता?

नासीर – हो. आता. तू यासाठी मुसलमान आहेस का की तुला समजायला लागल्यावर सर्व धर्मांची शिकवण दिली गेली आणि सांगितलं की तुला हवा तो धर्म तू निवड?

अलीम – नाही. मला तर दुसऱ्या महजबविषयी काहीही माहिती नाही.

नासीर – 'अरे मग ज्याबद्दल आपल्याला काहीही माहिती नाही त्याची त्याची आपण नफरत का करतो? तिरस्कार का करतो? का आपल्या मुलांबाळांना दुसऱ्या धर्माचा व्देष करायला शिकवतो? तो इतरांचा तिरस्कार करत वाढावा म्हणून आपण जीवाच्या आकांतानं का प्रयत्न करतो? आपल्या जगण्याचं बळ दुसऱ्याच्या तिरस्कारात का शोधतो?'

पुढे नासीर म्हणतो, की "अरे मग जे आपण निवडलेलं नाही, त्यासाठी कुणाचं रक्त सांडायचा आपल्याला काय अधिकार?.... अरे मग समजवा नं धर्माचा मुखवटा घातलेल्या या स्वार्थी सेवकांना"

नासीरने लोकांना सांगितले की आपण दुसऱ्या धर्मांचा आदर करायला हवा. दुसऱ्या धर्माविषयी माहिती नसेल तर त्या धर्माचा तिरस्कार करू नये. आपल्या मुलांना दुसऱ्या धर्मांचा व्देष करायला शिकवू नये. माईविषयी त्याने उस्तादला सांगितले, की जर ती पूजा करत असेल, तर तिच्या धर्माप्रमाणे चालायचा तिला पूर्ण अधिकार आहे.

तेथील मौलावींनीसुद्धा उस्तादला सांगितले, की हिंदू स्त्री इथे अवश्य राहू शकते. उस्तादने मौलवींना विचारले, 'एक हिंदू औरत इथे राहू शकते? यावर मौलवी म्हणाले हॉ, हॉ! जरूर राहू शकते.... खुदाचा हुक्म आहे.... तुमच्याकडे जर कुणी आसरा मागितला तर त्याला आसरा द्या. तसेच स्पष्ट केले की, व्यक्तिगत स्वार्थासाठी अल्लाहचा हुकुम मोडता येणार नाही.' स्वत:च्या फायद्यासाठी दुसऱ्यांवर अत्याचार करू नये. धर्मासाठी लढण्यापूर्वी धर्म नीट समजून घ्या... धर्मानं वागायला शिका. धर्मासाठी लढणं म्हणजे मोहाशी धर्मयुद्ध पुकारणं होय, असे त्यांनी सांगितले.'

तन्नो ही मुलगीसुद्धा पुरोगामी विचारांची आहे. हमीदा, तन्नो व कासीम माईवर प्रेम करू लागले, तिला आनंदाने हवेलीत दिवाळी साजरी करायला सांगितले, तेव्हा तन्नो म्हणाली, 'अम्मी! जर आपण आणि दादी एकाच घरात एक साथ राहू शकतो, तर हिंदूस्तानात हिंदू – मुसलमान एकसाथ का राहू शकले नसते?' तसेच 'मग हे पाकिस्तान कशासाठी?' असा प्रश्न तिने केला.

नासीर, मौलाना, तन्नो या सर्वांचेच विचार मानवता जपणारे आहेत. समानता, बंधुभाव त्यांच्या विचारांतून व्यक्त होतात.

हिंदू माई कासीमच्या घरात राहिली आहे, म्हणून तन्नोचे लग्न मोडले. म्हणून माईनी हिंदूस्तानात जायचा निर्णय घेतला. पण कासीमच्या सर्वच कुटुंबाने तिला जाऊ दिले नाही.

लाहोरमधील धर्मांध लोकांनी कासीमच्या घरावर हल्ला केला. माईनी सर्वांना सांगितले होते, की हे मारेकरी माणसा—माणसातलं प्रेम लुबाडू शकत नाहीत. यावेळी कासीम, हमीदा, जावेद, तन्नो, नासीर, अलीम सर्वच जण निर्भयपणे मारेकऱ्यांना सामोरे गेले, पण या एकजुटीपुढे ते मारेकरी तग धरू शकले नाहीत. शेवटी मानवतेचाच विजय झाला. धर्म व देशापलीकडे जाऊन एकमेकांवर प्रेम करणारी,

माणसाकडे माणूस म्हणून पाहणारी माणसे या नाटकात दिसतात. धर्मांधतेला बाजूला सारून माणूसकीला महत्व देणारी माणसे या नाटकात दिसतात. म्हणून, मानवता, बंधुत्व, समता अशा पुरोगामी मूल्यांची जाणीव करून देणारे हे नाटक अत्यंत महत्वाचे, सकस ठरले.

लेखकांच्याच शब्दांत सांगायचे तर, 'नाकारलेली, तोडून टाकलेली, तुटलेली, अलग पाडलेली—धास्तावलेली माणसं... पुन्हा उभी राहतात. जात, धर्म, देशापल्याड जाऊन एकमेकांना जीवापाड जपतात. एकमेकांच्या आधारानं पुन्हा घरं उभी करतात... स्वप्न बघतात......! आपल्याच घराला चूड लावणाऱ्यांविरूद्ध निर्भयपणे उभी राहतात.... त्यांचंच तर हे नाटक आहे!'

या नाटकाविषयी अभिप्राय देताना एम. पी. पाटील 'अनुष्टुभ' मध्ये लिहितात, 'धर्मांध क्रोर्याविरूद्ध सामान्य माणसानेच उभे राहिले पाहिजे. मानवी आत्मभानाने आणि आत्मबळाने आपण त्याच्याविरूद्ध ठामपणे उभे राहिलो तर त्या धर्मांधतेचा पराभव अटळ असतो, आणि मानवी आत्मभानाशी संवादी नातेबंध माणसामाणसांमध्ये निर्माण होत असतो. हेच तर माणसाला हवे असते आणि हाच संस्कार, ही समज हे नाटक देत राहते.'

धर्मांधता सोडून वास्तव दृष्टिने जर जगण्याकडे पाहिले, तर निश्चितच मानवता निर्माण होईल, असे या नाटकात मांडले, हे एम. पी. पाटील यांचे मत योग्यच आहे.

अशा प्रकारे जात, धर्म, देश यांपलीकडे जाऊन एकमेकांना जपणारी माणसं या नाटकात दिसतात, यालाच मानवता म्हणतात! ही पुरोगामी जाणीव या नाटकातून जाणवते, माणसाला माणूस म्हणूनच पाहण्याची, स्वीकारण्याची नितांत निकड असल्याची जाणीव व प्रेरणा 'राहिले दूर घर माझे' हे नाटक अभिव्यक्त करते.

त्याचप्रमाणे, निखिल वागळे (महानगर) लिहितात, 'प्रेक्षकांना मुळापासून हलवण्याचं सामर्थ्य या नाटकात आहे. स्वत:ला हिंदू आणि मुसलमान म्हणवणाऱ्या प्रत्येकाने हे नाटक आवर्जुन बघायला हवं.' मानवी आत्मभान देणाऱ्या नाटकाविषयीचा हा अभिप्राय यथार्थ ठरतो.

**ओसामा— आसिफ ह. अन्सारी:**

आसिफ ह. अन्सारी यांच्या 'ओसामा' या नाटकामध्ये तळागाळातील, दलितसदृश्य मागासलेले जीवन जगणाऱ्या ओसामा या शाळकरी मुलाचे चित्रण आले

आहे. खालवलेल्या कौटुंबिक व सामाजिक परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी ओसामा धडपडत होता. त्यासाठी त्याने शिक्षणाची कास धरली होती.

ओसामाला त्याच्या वडिलांच्या इच्छेमुळे खाटकाच्या धंद्यात त्यांना मदत करावी लागत होती. त्यामुळे त्याला रोज शाळेत जाणे जमत नव्हते. त्याचा अभ्यास बुडायचा. परंतु जातीने ब्राम्हण असलेली ज्योती ही त्याच्या वर्गातली मुलगी त्याला झालेला अभ्यास शिकवत होती. त्याला शिकण्यासाठी प्रोत्साहन देत होती. तसेच जातिभेद न मानता शाळेतही ओसामाच्या शेजारी बसत होती. वर्गातली मुले ओसामाला 'जुम्मे के जुम्मे नहाता है' म्हणून चिडवत होती.

भारत पाकिस्तान क्रिकेट सामन्याच्यावेळी पाकिस्तान जिंकला तेव्हा राजूने ओसामाला विचारले, 'तुमचा पाकिस्तान जिंकला म्हणून वाजवले असतील ना फटाके,'

त्यावर ओसामा म्हणाला, 'आमचा कशाचा पाकिस्तान'?

दीपक म्हणाला 'तुमचा पाकिस्तान, तू मुसलमान आहेस, पाकिस्तानी, तू पाकिस्तान जिंकला की फटाके वाजवतोस'

गोपाळ म्हणाला, 'पाकिस्तानी कुठला!'

याचे ओसामाला खूप दु:ख झाले. ते दु:ख व्यक्त करताना ओसामा, ज्योतीला म्हणतो.....'आपण ज्या मातीत जन्म घेतला त्या मातीशी प्रेम हे नैसर्गिक असतं.' तरी देखील मला मुले चिडवतात पाकिस्तानी, पाकिस्तानी का तर मी मुसलमान आहे म्हणून'...

'माझा जन्म इथं झालाय, या मातीत मी राहतो तरी सुध्दा मी भारतीय नाही... अगं ज्या देशात आमचं सर्व काही आहे, तरी सुध्दा आम्हाला आमचं प्रेम या देशावर आहे असं दाखवावं लागतं. का? का तर आम्ही मुसलमान आहोत म्हणून.... असं वाटतं. असं वाटतं...., आपण संपून जावं....नाही तर या खुदा तू मूझे उठाले नही तो मेरा ओसामा, ओसामा बिन लादेन न बन जाए'

तेव्हा ज्योती ओसामाची 'ती मुले मुर्ख आहेत' म्हणून समजूत काढत होती. वयाने लहान असूनही ज्योतीच्या उदात्त, मानवतावादी वर्तनाचे येथे दर्शन घडते. ती ओसामाकडे जाती–धर्माच्या संकुचित दृष्टिकोनातून न पाहता, मानव म्हणून पाहते.

ओसामाचे शिक्षक कुलकर्णी सर ओसामाला केवळ मुसलमान म्हणून भेदभावाची वागणूक देत होते. तो हुशार असूनही त्याला त्याची बुद्धिमत्ता दाखवण्याची संधी देत नव्हते. ब्राम्हण असलेल्या ज्योतीला वर्गामध्ये ते ओसामाच्या बाजूला बसू देत नव्हते.

कुलकर्णी सरांच्या निरोप समारंभाच्यावेळी ओसामाने त्याचे मनोगत व्यक्त केले. त्यात त्याने सरांना 'आदर्श शिक्षक' असे संबोधले. तसेच ज्ञानी माणसाची जात पाहू नये. त्याच्याकडे असलेल्या ज्ञानाकडे पहावे, असेही ओसामाने सांगितले. हे ऐकून कुलकर्णी सरांचे डोळे उघडले. हुशार असलेल्या ओसामावर आपण तो मुसलमान असल्यामुळे अन्याय केला, आपण शिक्षक असूनही शिक्षकी पेशास न्याय दिला नाही, याचा त्यांना पश्चाताप वाटू लागला. त्यांच्यातील मानवता जागृत झाली. त्यांनी ओसामाला डॉ.कलाम यांचे 'अग्नीपंख' हे पुस्तक भेट दिले. ते स्वत: शाळेतील मुलांना घेऊन ओसामाच्या घरी आले. ओसामाच्या अब्बूंना ओसामाच्या बुद्धिमत्तेबद्दल सांगून ओसामाला रोज शाळेत पाठविण्याविषयी त्यांचे मन:परिवर्तन केले. या सर्वाचा परिणाम ओसामाच्या वर्गमित्रांवरही झाला. त्यांनी ओसामाला पुन्हा चिडवणार नाही असे सांगून त्यांच्याबरोबर शाळेत येण्याविषयी आग्रह केला.

भारतातील मुस्लिम याच मातीतले, मूळचे इथलेच, पण केवळ मुसलमान म्हणून त्यांच्याकडे भेदभावाच्या दृष्टिकोनातून पाहिले जाते. वरील प्रसंगातून लेखकांनी निखळ मानवतेचे दर्शन घडवले आहे. कुलकर्णी सरांच्या मनात ओसामाबद्दल आपुलकी, प्रेम निर्माण झाले, तसेच वर्गातील इतर मुलांनाही त्यांची चूक कळली. त्यांच्याही मनात ओसामाविषयी प्रेम निर्माण झाले. या एकांकिकेतून अशा प्रकारे मानवता ही पुरोगामी जाणीव व्यक्त झाली आहे.

**समाजाला विषमतामुक्त मानवतावादी भ्रष्टाचारमुक्त, व शोषणमुक्त**

**अशी जगण्याची नवी सृजनशील दृष्टी देण्याची जाणीव**

**शोभायात्रा — शफाअत खान :—**

'शोभायात्रा' हे शफाअत खान यांचे अल्पसंख्यांक आणि बहुसंख्यांक यांच्या नात्याबद्दलचे नाटक आहे. बाबरी मशीद पाडली जाणे, आणि त्यानंतर घडलेल्या मुस्लिम अल्पसंख्यांकावर अत्याचार करणाऱ्या घटनांमुळे भारतीय मुस्लिमांना या समाजानं जाणीव करून दिली, की तुम्ही 'मुस्लिम अल्पसंख्यांक' आहात. या

जाणीवेतून आजच्या वास्तवाला तडक भिडणारं साहित्य निर्माण करण्याची गरज मुस्लिम लेखकांना वाटली त्यातूनच 'शोभायात्रा' या नाटकाची निर्मिती झाली.

स्वातंत्र्यानंतरच्या पन्नास वर्षांत या समाजाचा जो ऱ्हास झाला, त्याविषयी वाटणारी अस्वस्थता या नाटकात मांडली आहे. स्वातंत्र्य कुणाला मिळालं, या प्रश्नाचं उत्तर सापडत नव्हतं. भ्रष्टाचार, जाती–जमातींतील गलिच्छ राजकारण, स्वत:च्या फायद्यासाठी केलेलं इतिहासाचं विकृतीकरण, अहिंसेने सुरवात करून पुर्णपणे हिंसेला शरण गेलेला समाज आणि भौतिक सुखामागे उर फाटेस्तोवर धावणारे संवेदनहीन लोक या साऱ्या गोष्टींविषयीची चीड, अस्वस्थता, घालमेल, अल्पसंख्यांक व बहुसंख्यांक यांच्या नात्यातील तणाव या नाटकातून व्यक्त झाला आहे.

'शोभायात्रा' हे नाटक म्हणजे 'चेहऱ्यांपाठच्या चेहऱ्यांचा' खेळ आहे. स्वातंत्र्यप्राप्तीला पन्नास वर्षे पूर्ण झाल्याबद्दल चित्ररथातून स्वातंत्र्यासाठी लढलेल्या विविध महान व्यक्तिमत्वांचा वेष धारण केलेल्या लोकांची शोभायात्रा निघणार होती. हे लोक आजच्या समाजातील उच्चशिक्षित, उच्चवर्णिय आणि बहुसंख्यांक गटातील आहेत. महात्मा गांधी, सुभाषबाबू, नेहरू, टिळक अशा रूपकांव्दारे भारतीय समाजाचं वास्तव चित्र लेखक शफाअत खान यांनी उभं केलं आहे. भारतमातेची स्थिती, ब्राम्हण–मराठे यांच्यातील ताण, भ्रष्ट उच्चवर्गीय, तळागाळातील पिचलेल्यांचे शोषण यांचे चित्रण आले आहे. यातील तरूण बाबू आणि छोट्या हे भारतातील तळागाळातील अल्पसंख्यांकांचे प्रतिनिधित्व करतात.

या नाटकातील छोट्या फूटपाथवर राहतो. चहाच्या दुकानात पोऱ्या म्हणून काम करतो. सामाजिक ज्ञान नाही. शिक्षणाचा अभाव. भारतावर मनापासून प्रेम आहे, पण स्वातंत्र्यानंतरच्या पन्नास वर्षानंतरही छोट्यासारख्या लोकांना मागासलेले, भरकटलेले जीवन जगावे लागते. मग हे लोक जगण्यासाठी भाईचा आधार शोधतात. उच्च वर्णियांच्या दृष्टिकोनातून अशा लोकांना काहीच महत्व नाही. या वर्गाला काय वाटतं याचा कोणी विचार करत नाही.

छोट्यानेही सोनेरी भविष्याची स्वप्ने पाहिली, पण समाजात त्याला संशयित, देशद्रोही अशा दृष्टिने पाहिले जाते. स्वार्थी राजकारणी लोक जातीय दंगली घडवून आणतात, त्यावेळी या निष्पाप लोकांचा बळी जातो, म्हणून तो दहशतीत जीवन जगतो. म्हणूनच त्याला सतत भयंकर स्वप्न पडतं. त्याच्याच शब्दांत, 'मी, भाऱ्या, काळ्या – आम्ही सगळे झोपलेलो असतो – मग पोलिसांची गाडी येते – खाड खाड बूट वाजवत पोलिस येतो. तो माझ्या गांडीवर जोरजोरात फटके मारतो'

अशावेळीही हा भास त्याला आपलाच वाटतो. तो भारताच्या शरणातच आसरा शोधतो. पण वर्गभेद करणारे उच्चवर्णीय करणारे उच्चवर्णीय तो आसरा त्याला मिळू देत नाहीत.

नाटकातील वरील प्रसंगात छोट्या घाबरून झेंडा खांद्यावर लपेटून भयाने थरथर कापत उभा असताना सबनीस त्याच्या अंगावरचा झेंडा हिसकावून घेतात. दुसऱ्या एका प्रसंगात छोट्या बाबूला विचारतो, की 'कसली मिरवणूक निघणार आहे?' तेव्हा बाबू म्हणतो, की 'त्यांच्या' स्वातंत्र्याला पन्नास वर्षे झाली. याचा अर्थही छोट्याला कळत नाही. परंतु या प्रसंगातून तळागाळातील उपेक्षित जीवन जगणाऱ्या लोकांची स्थिती चित्रित झाली आहे.

बाबूच्या घरी त्यांची आई, भाऊ व बहिण आहेत. बाबूच सर्वात मोठा. खालावलेल्या परिस्थितीमुळे शाळा सोडलेली. शिक्षण नाही, त्यामुळे नोकरीही नाही. कुटुंबाची जबाबदारी येऊन पडलेली. अशा वेळी भाई हा गुंड त्याचे घर चालवतो. त्या बदल्यात भाई सांगेल ती कामे त्याला करावी लागतात. भाईलाच तो आपला आदर्श मानतो.

बाबूला भाईकडे काम करण्यापेक्षा प्रामाणिकपणे चाकरी करून दोन घास खावेत असेही वाटते. शाळेत शिपायाची तरी नोकरी मिळावी म्हणून तो जाधव वकीलांकडे विनवणी करतो, पण जाधव त्याला म्हणतात, की तू भाईकडेच काम कर. तिथेच तू नावारूपाला येशील! अशा मनोवृत्तीमुळे बाबूसारखे अनेक लोक गुन्हेगारीच्या गर्तेत ढकलले जातात.

नाटकातील एका प्रसंगात मिरवणूकीचा चित्ररथ ठरल्यापेक्षा थोडा लहान झाल्यामुळे एक पात्र कमी करा, असा निरोप येतो. सगळे उच्चवर्णीय प्रथम एकमेकांचा बळी द्यायचा प्रयत्न करतात. सगळे स्वार्थी. कोणी मागे होत नाही. शेवटी बाबू करत असलेले बाबू गेनूचे पात्र कापून टाकावे असे सबनीस म्हणतात.

शिवाय जो इतिहास लोकप्रिय आहे, तोच सगळे स्वीकारणार, असेही म्हणतात. हे ऐकून बाबू म्हणतो, 'ज्या माझ्या इतिहासाच्या आधारे मी जगू बघतोय — त्या इतिहासाबद्दलच तुम्ही माझ्या मनात घृणा निर्माण करताय.' या प्रसंगातून उच्चवर्णियांचा तळागळातील उपेक्षितांना स्वत:च्या स्वार्थासाठी चिरडून टाकण्याचा मानस स्पष्ट होतो. बाबू जेव्हा याचा विरोध करतो, तेव्हा भाईचा गुंड बाबूला लाथेने तुडवतो. 'बार्बी' स्वत:च्या स्वार्थासाठी बाबूशी प्रेमाचे नाटक करते, नंतर त्याला झिडकारून टाकते.

या प्रसंगातून उच्चवर्णीय, तसेच परकीय शक्तींचा तळागाळातील उपेक्षितांना स्वत:च्या स्वार्थासाठी चिरडून टाकण्याचा मानस स्पष्ट होतो.

शफाअत खान यांनी हे नाटक लिहिलं, ते प्रेक्षकांना त्याचं जगणं समजावून सांगण्यासाठी, त्यांच्या जगण्याच्या वास्तवाचं भान देण्यासाठी, त्यांना धीर देण्यासाठी, त्यांना जगण्याची नवी दृष्टी व बळ देण्यासाठी. आसपासच्या हजारो माणसांचं जगणं उध्वस्त होत असलेलं पाहून नाटककारांच्या संवेदनशील मनाने ते अनुभव मांडले. विविध प्रसंगांतून भ्रष्टाचार, अल्पसंख्यांकांकडे अनुदार दृष्टीने पाहणे, स्वातंत्र्याचे सोहळे साजरे होत असतानाचा स्त्रीची समाजात होणारी विटंबना पाहूनही तटस्थ राहणे हे वास्तव नाटकारांनी प्रेशकांपुढे मांडले. त्यातून आपल्या जगण्याकडे, तत्वांकडे उघड्या डोळयांनी पहावयास लावले, पुन्हा नव्याने विचार करावयास भाग पाडले, भ्रष्ट समाजाचं हे चित्र उघड होताच हे जग बदलता येईल ही जाणीव प्रेक्षकांत निर्माण होते. विषमतामुक्त, शोषणमुक्त, सृजनशील नव्या समाजाचे स्वप्न साकार करण्याची जाणीव प्रेक्षक प्राप्त करतो.

अश्याप्रकारे मुस्लिम मराठी नाटके पुरोगामी जाणिवा व्यक्त करून समाजाला दिशादर्शन करतात आणि माणुसकीच्या नव्या पहाटेचे स्वप्न पाहतात.

## संदर्भ सूची :

१. जावेद कुरैशी 'पाशा', चित्कार, युगसंवाद प्रकाशन, नागपूर, प्र.आ. १९९७.

२. शफाअत खान, राहिले दूर घर माझे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर प्र. आ. २००१.